


दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET
Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816
■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३३९ ■ शनिवार,, दि. १२ एप्रिल २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -339 ■ Saturday, 12 April 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## ‘प्रत्येक गावात ८-१० लोक मरू द्या, बस पेटवा’ ; वक्फ कायद्याला विरोध करणाऱ्यांना काँग्रेस नेत्याने भडकवले

### काँग्रेस नेत्याविरोधात गुन्हा दाखल, भडकावणाऱ्या वक्तव्याचा व्हिडिओ व्हायरल

**बंगळुरू / दावणगेरे :** वक्फ (दुरुस्ती) कायद्यावरून (Waqf Amendment Bill 2025) देशभरात सुरू असलेल्या वादात आता आणखी एक खळबळजनक वळण आले आहे. कर्नाटकातील काँग्रेसचे माजी नगरसेवक कबीर खान यांनी आंदोलनकर्त्यांना ङ्गप्रत्येक शहरातून ८-१० लोक मरायला हवेत. ५०-१०० गुन्हे दाखल व्हायला हवेत. बस-ट्रेन जाळाङ्क अशा स्वरूपाचे आक्षेपार्ह आणि भडकावू वक्तव्य केल्याचा व्हिडिओ समोर आल्याने खळबळ उडाली आहे.

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या दोन मिनिटांच्या व्हिडिओत कबीर खान यांनी वक्फ कायद्याच्या विरोधातील निषेध अधिक उग्र करण्याचे आवाहन करताना, पोस्टर धरून आणि निवेदन देऊन काही होणार नाही, असे म्हणत आंदोलनकर्त्यांना हिंसक मार्ग अवलंबण्याचा सल्ला दिला आहे. कबीर खान तरुणांना रस्त्यावर येण्याचे, सार्वजनिक मालम त्तेचे नुकसान करण्याचे आणि कायद्याच्या विरोधात निषेध नोंदवण्यासाठी प्राणांचे बलिदान देण्याचे आवाहन करताना दिसत आहे. बस, ट्रेन जाळा. या गोष्टी फक्त बोलून होत नाही. त्यासाठी मोठ्या प्रमाणात त्याग, बलिदान द्यावे लागेल, असे कबीर खान यांनी म्हटले आहे.

**कायदा आणि सुव्यवस्थेला धोका**

या वक्तव्यानंतर दावणगेरे पोलीस विभागाने तत्काळ कारवाई करत भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. सोशल मीडियावर तुफान चर्चेत असलेला हा व्हिडिओ ८ एप्रिल रोजी अज्ञात ठिकाणी रेकॉर्ड करण्यात आला होता. व्हिडिओ समोर आल्यानंतर कबीर खान फरार असून, त्याचा मोबाईल बंद आहे. पोलिसांकडून त्याचा शोध घेतला जात आहे.


**विरोध आणि टीकेची लाट**

या वक्तव्यावर सर्वच स्तरांतून तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, राजकीय वतुर्ळात काँग्रेसवरही टीकेची झोड उठली आहे. एका बाजूला काँग्रेस वक्फ कायद्यातील बदलांवर मौन बाळगत असल्याचा आरोप होत असतानाच, दुसऱ्या बाजूला तिच्या माजी पदाधिकाऱ्याचे असे विधान समोर येणे पक्षाच्या अडचणी वाढवणारे ठरत आहे.

**पश्चिम बंगालनंतर कर्नाटकमध्येही अस्वस्थता** - अलीकडेच पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबादमध्ये वक्फ कायद्याच्या विरोधात हिंसक आंदोलन उसळले होते. आता कर्नाटकमध्ये अशा प्रकारचे भडक वक्तव्य समोर येणे देशभरातील कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने चिंताजनक मानले जात आहे.

## सप्तशृंगी गडावर कीर्ती ध्वज फडकला

वणी : आग ओकणारा सूर्य, त्यात पायी प्रवास. यामुळे अंगातून निघणाऱ्या घामाच्या धारांनी आदिमायेच्या भक्तीत चिंब भिजत लाखो भाविक गडावर दाखल झाले. त्यानंतर दर्शनबारीत तासनतास





उभे राहत लाखो भाविक देवी चरणी लीन झाले. आई भगवतीच्या भेटीसाठी खानदेश प्रांतातून आलेले सुमारे दोन लाखांवर भाविक भक्त सप्तशृंगगडावर भक्तीसागरात दंग झाल्याचे पहायला मिळाले. दरम्यान, शुक्रवारी (ता. ११) दुपारी आदिम ायेच्या किर्तीध्वजाचे ट्रस्ट कार्यालयात विधीवत पूजन होवून ढफफ-ढोलाच्या गजरात उत्साहात मिरवणूक काढण्यात आली. रात्री १२ वाजता मध्यरात्री गडाच्या शिखरावर किर्तीध्वज फडकल्यानंतर खानदेशवासियांनी ध्वजाचे दर्शन घेतले.

आद्यस्वयंभू शक्तीपीठ श्री सप्तशृंगी माता चैत्रौत्सवादरम्यान आजची चतुर्दशी (चौदस) निमित्त आदिमायेच्या दर्शनासाठी खानदेश वासियांच्या दृष्टीने विशेष महत्व असल्याने लाखावर भाविक सप्तशृंगीचा जयघोष करत ढोल-ताशांचा निनादात अनवाणी आलेल्या भाविकांचे पावले अविश्रांतपणे सप्तश्रृंगगड पायी रस्ता चढून आले. पहाटेपासूनच दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. दर्शनार्थी भाविकांची गर्दी वाढत जाऊन बाऱ्या लागल्या होत्या. सकाळी ७.३० वाजता देवीच्या अलंकारांची ढोल- ताशाच्या गजरात विश्वस्त संस्थेच्या कार्यालयातून मिरवणूक काढण्यात आली. भगवतीची आजची पंचामृत महापूजा श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्टचे विश्वस्त मनज्योत पाटील व विश्वस्त डॉ. प्रशांत देवरे यांनी परिवारासमेवत केली. दुपार सत्रात विश्वस्त संस्थेच्या कार्यालयात किर्तीध्वजाची विधिवत पूजा विश्वस्त संस्थेचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश बी. व्ही. वाघ, उपविभागीय अधिकारी अकुनरी नरेश, तहसीलदार रोहिदास वारुळे, विश्वस्त मंडळ प्रतिनिधी ॲड. ललित निकम, ॲड. दीपक पाटोदकर, मनज्योत पाटील, डॉ. प्रशांत देवरे, भूषणराज तळेकर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलिस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी, ध्वजाचे मानकरी एकनाथ गवळी, विष्णू गवळी. कृष्णा गवळी, काशिनाथ गवळी, आनंदा गवळी, दत्तू गवळी, ट्रस्टचे व्यवस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सुदर्शन दहातोंडे, सहाय्यक व्यवस्थापक भगवान नेरकर, इस्टेट कस्टोडियन प्रकाश पगार, कार्यालयीन अधीक्षक प्रकाश जोशी, जनसंपर्क अधिकारी भिकन वाबळे, पोलिस पाटील शशिकांत बेनके आदींनी केले.

## पंजाबमध्ये १२७.५४ कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त

अमृतसर : पंजाब पोलिसांनी अमृतसरच्या घरिंडा पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या खैरा गावातील हिरा सिंग याला अटक करून त्याच्याकडून १८.२२७ किलो हेरॉईन जप्त केली आहे. आतंरराष्ट्रीय बाजारपेठेत याचे मूल्य १२७.५४ कोटी रुपये आहे. पंजाब पोलिसांच्या अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्स (एएनटीएफ) बॉर्डर रेंज यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली आहे.

याप्रकरणाच्या तपासात असे आढळले की, हीरा सिंग आणि त्याचा साथीदार कुलविंदर सिंग उर्फ किंडा (गाव दौके, पोलिस स्टेशन घरिंडा) हे पाकिस्तानस्थित ड्रग्ज तस्कर ‘बिल्ला’ याच्या संपर्कात होते. बिल्लाच्या सूचनेनुसार हे दोघेही सीमेपलीकडून हेरॉइनची तस्करी करायचे आणि पंजाबमध्ये ते पुरवायचे. हे हेरॉइन पाकिस्तानमधून ड्रोनद्वारे पोहोचवले जात होते किंवा सीमावर्ती भागात निश्चित ठिकाणी सोडले जात होते. बिल्लाच्या सूचनेनुसार, हीरा सिंग आणि त्याचा साथीदार हे सामान उचलून राज्याच्या विविध भागात तस्करी करायचे. हीरा सिंगला अटक करण्यात आली असली तरी त्याचा साथीदार कुलविंदर सिंग अजूनही फरार आहे. पोलिस पथके त्याच्या संभाव्य लपण्याच्या ठिकाणांवर सतत छापे टाकत आहेत. या नेटवर्कमध्ये आणखी कोण कोण सामील आहे हे देखील सुरक्षा संस्था शोधण्याचा प्रयत्न करत आहेत.

## सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी बिद्रेच्या आरोपीला २१ एप्रिलला मिळणार शिक्षा

**नवी मुंबई : अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी बिद्रे हत्याप्रकरणात नवीन अपडेट समोर आली आहे. अश्विनी बिद्रे हत्येप्रकरणात पोलीस निरीक्षक अभय कुरुंदकरला दोषी ठरवण्यात आलं आहे. लिव-इन पार्टनर अश्विनी बिद्रेची हत्या करुन तिच्या शरीराचे तुकडे करणे आणि त्यांची विल्हेवाट लावून पुरावे नष्ट करणे असे आरोप कुरुंदकरवर होते. न्यायालयाने कुरुंदकर आणि त्याच्या दोन साथीदारांना दोषी ठरवले आहे. दोषींच्या शिक्षेचा निर्णय न्यायालय २१ एप्रिल रोजी जाहीर करणार आहे. पनवेल सत्र न्यायालय निर्णय देणार आहे.

अभय कुरुंदकर हे मुंबई पोलिसांच्या ताफ्यातील नावाजलेलं नाव होत. त्यांना राष्ट्रपती पदक सुद्धा मिळालं होतं. कुरुंदकर त्यांच्या सोबत काम करणाऱ्या अश्विनी बिद्रेच्या प्रेमात पडले. पण २००५ साली अश्विनी बिद्रेचं लग्न राजू गोरे नावाच्या व्यक्तीशी झालं. लग्नाच्या दोन वर्षांनी तिने म हाराष्ट्र पीएससी उत्तीर्ण केली आणि पोलिसात सब-इन्स्पेक्टर झाली. तिचं पहिलं पोस्टिंग पुण्यात झालं. तीन वर्षांनंतर, अश्विनीची सांगलीला बदली झाली.

अश्विनीची हत्या झाली तेव्हा तिची



मुलगी अवघ्या ६ वर्षांची होती. अश्विनीची पोस्टिंग रत्नागिरी येथे २०१३ मध्ये झाली. कुरुंदकरचे लग्न झालेले असूनसुद्धा तो अश्विनीसोबत लिव-इन पार्टनर म्हणून राहत होता. दोघांच्याही घरी याची कल्पना होती. अश्विनी २०१४ मध्ये तिच्या पतीपासून वेगळी झाली. मात्र अभयच्या घरी या घडामोडीची माहिती नव्हती. अभय आणि अश्विनी नवी मुंबईत भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहू लागले.

अश्विनीला २०१५ मध्ये बढती मिळाली आणि ती सहाय्यक पोलिस निरीक्षक बनली. बढती झाल्यानंतर ती ११ एप्रिल २०१६ रोजी बेपत्ता झाली. अश्विनीच्या भावाला आनंदला १५ एप्रिल रोजी फोनवर मेसेज आला की ती काही कामासाठी उत्तर प्रदेशला जात आहे आणि एका आठवड्यानंतर परत येईल. मेसेज आल्यामुळे अश्विनीच्या घरचे निवांत होते. मात्र एक दिवस अचानक अश्विनीच्या वडिलांना नवी मुंबई पोलिस मुख्यालयातून मोबाईलवर फोन आला आणि त्यांच्याकडे अश्विनीबद्दल चौकशी करण्यात आली.

अश्विनी दोन महिन्यांपासून कामावर आली नाही, असे त्यांना सांगण्यात आलं. पण कोल्हापुरात राहणाऱ्या अश्विनीच्या कुटुंबाला याबद्दल काहीच माहिती नव्हते. यानंतर अश्विनीचा शोध घेण्यात आला. पोलिसांनी चौकशी केल्यानंतर त्यांना अभय आणि अश्विनी यांच्या नात्याबद्दल स्पष्टता मि ळाली. त्यानंतर पोलिसांनी अभयची चौकशी केली पण त्यांना काहीच सापडले नाही.

## गेटवे ऑफ इंडिया येथील तिकिटांच्या दरात मनमानी वाढ

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुंबई-मांडवा अंतर बोटीने पार करण्यासाठी १०० ते ३०० रुपये तिकिट दर आकारले जात असताना आता गेट वे ऑफ इंडिया येथील जेट्टी क्रमांक ५ वर मात्र प्रवाशांकडून याच प्रवासासाठी एक हजार रुपये घेतले जात आहेत. भाजपाचे माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी ही बाब उघडकीस आणली असून राज्य सरकारने या प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. गेटवे ऑफ इंडिया येथील जेट्टी क्रमांक ५ वर प्रवासी व पर्यटकांची लूट



सुरू असल्याचा आरोप भाजपचे कुलाबा येथील माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी केला आहे. प्रवाशांकडून अव्वाच्या सव्वा पैसे उकळले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच याप्रकरणी राज्य सरकार आणि मुंबई पोर्ट ट्रस्टला (एमबीपीटी) पत्र पाठवून गेटवे येथील जेट्टी क्रमांक ५ वरील कामकाजाची, तसेच एमबीपीटी आणि मांडवा एलएलपी यांच्यामधील करारातील अटींची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. स्पीड बोट सेवांसाठी अवाजवी शुल्क आकारले जात असल्याच्या असंख्य तक्रारी आपल्याला प्राप्त झाल्या आहेत. गेट वे ऑफ इंडियावरून मांडवाला जाण्यासाठी प्रति व्यक्ती एक हजार रुपये शुल्क आकारले जात आहे. गेट वे ऑफ इंडिया येथील इतर जेटीवरून त्याच प्रवासासाठी सुमारे १०० ते ३०० रुपये दर आकारतात. त्यामुळे हे तिकिट दर खूपच अवाजवी असल्याची तक्रार करण्यात येत आहे. तसेच या जेट्टीवर तिकीट दर कुठेही पारदर्शकपणे जाहीर केलेले नाहीत.

## ‘ग्रंथमहोत्सव’चे रुपांतर आनंद सोहळ्यात व्हावे

### -पालकमंत्री संजय शिरसाट यांचे प्रतिपादन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



पुस्तक वाचनाचा फायदा माणसाला जीवनभरात नक्की होत असतो. समाजमन घडविण्या-या ग्रंथाच्या या महोत्सवाचे रुपांतर आनंद सोहळयात व्हावे, असे प्रतिपादन राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात ७ ते १४ एप्रिल दरम्यान भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव साजरा होत आहे. यानिमित्त विद्यापीठात पहिल्यांदाच ११ ते १४ एप्रिल दरम्यान इतिहास वस्तू संग्रहालयाच्या हिरवळीवर उभारलेल्या भव्य मंडपात ग्रंथ महोत्सव घेण्यात येत आहे. या महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्र्याच्या हस्ते शुक्रवारी (दि.११) करण्यात आले. कुलगुरु डॉ. विजय फुलारी अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्र-कुलगुरु डॉ.वाल्मिक सरवदे, कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ.भारत खंदारे, डॉ.योगिता पाटिल, ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ.वैशाली खापर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच नंदकुमार घोडेले, राजेंद्र जंजाळ, अशोक पटवर्धन यांची ही मंचावर उपस्थिती होती. उद्घाटन प्रसंगीश्री.शिरसाट म्हणाले, विद्यापीठात पहिल्यांदाच मोठया प्रमाणावर ग्रंथ महोत्सव होत आहे. आजकाल वाचन संस्कृती लोप पावत असून या प्रदर्शनात आलेल्या प्रत्येकाने किमान एक पुस्तक विकत घेऊन वाचन करावे.

महोत्सवात देशभरातून २० नामांकित प्रकाशक सहभागी झाल्याचे प्रकुलगुरु डॉ.वाल्मिक सरवदे यांनी प्रास्ताविकात सांगितले. प्रा.प्रराग हासे यांनी सूत्रसंचालन तर कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास शिक्षक, कर्मचारी, रोजदांरी कर्मचारी, विद्यार्थी व वाचक मोठया संख्येने उपस्थित होते.इतिहास वस्तू संग्रहालयच्या हिरवळीवर १४ एप्रिलपर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ६ या दरम्यान ग्रंथ प्रदर्शन व विक्री सुरु राहणार आहे.

**वसतिगृहासाठी २५ कोटी देऊ : मा.पालकमंत्री**

विद्यापीठात आल्याचा मला मनस्वी आनंद असून वसतीगृहासाठी २५ कोटींचा निधी सामाजिक न्याय विभागातर्फे देण्यात येईल, असे आश्वासन श्री.शिरसाट यांनी दिले. विद्यापीठास आवश्यक ते सहकार्य राज्य शासनाकडून करण्यात येईल, असेही ते म्हणाले. ‘नॅशनल बुक ट्रस्ट’ च्या वतीने पुढील वर्षी राष्ट्रीय दर्जाचे पुस्तक प्रदर्शन घेऊ, असे कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी अध्यक्षीय समारोपात घोषित केले.

**वीस प्रकाशंकाचा सहभाग**

या ग्रंथ महोत्सवात देशभरातून २० प्रकाशक सहभागी झाले. यामध्ये ऑक्सफर्ड हाऊस, वायकिंग बुक, बुक एन्क्लेव्ह, ॲपेक्स पब्लिकेशन (सर्व जयपूर), करंट पब्लिकेशन (आग्रा), युनिव्हर्सल पब्लिक सिंग, एन.एम मेडिकल बुक्स, वक्रतुंड बुक्स, कवडवाल बुक्स, न्य एस इंटरनॅशनल (मबई), प्रशांत बुक्स, विज्ञान बुक्स राजकमल, आहुजा, टेक्निसब बुक्स (नवी दिल्ली) सुमन बुक्स, कैलास पब्लिकेशन (छत्रपती संभाजीनगर) यांचा समावेश आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी सोहळ्यासाठी रायगड सज्ज

अलिबाग, दि. ११ (प्रतिनिधी) - रायगड किल्ला येथे श्री छत्रपती शिवाजीमहाराजांची ३४५वी पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम दि. १२ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला आहे. यावेळी शिवपुण्यतिथीनिमित्ताने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या १२ एप्रिल रोजी होणाऱ्या किल्ले रायगड दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर रोहयो मंत्री भरत गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व प्रमुख विभागांची आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी या कार्यक्रमाचे काटेकोर नियोजन करण्याच्या सुचना त्यांनी सर्व यंत्रणेला दिल्या.



महाड शासकीय विश्रामगृहात आयोजित बैठकीत ते उपस्थितांना मार्गदर्शन करताना बोलत होते. मंत्री भरत गोगावले यांनी हा कार्यक्रम सुनियोजित व सुव्यवस्थितपणे पार पडण्याची जबाबदारी सर्वांवरच आहे. प्रत्येकाने आपले काम चोखपणे बजवावे असे सांगितले. त्यावेळी गोगावले यांनी प्रत्येक विभागाकडून रायगडच्या पायथ्यापासून ते प्रत्यक्ष गडावर होणाऱ्या संपूर्ण कार्यक्रमाच्या नियोजनाचा आढावा घेतला. यामध्ये वाहनतळ, एसटी गाड्यांचे जाण्या-येण्याचे नियोजन, प्रमुख व आवश्यक ठिकाणी वीजपुरवठा, पिण्याचे पाण्याचे नियोजन, रोपवेच्या वापराच्या वेळा, गडाचा पायथा ते गडावरील कार्यक्रमा दरम्यानची आरोग्य सुविधा, तात्पुरती होणारी हेलिपॅड निर्मिती, रस्ते व दळणवळणाचे नियोजन या प्रमुख मुद्द्यांवर चर्चा करून यातील त्रुटी व समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

बैठकीस जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, महाडचे प्रभारी प्रांताधिकारी संदीपान सानप, तहसीलदार महेश शितोळे गटविकास अधिकारी डॉ. स्मिता पाटील, इत्यादी प्रमुख अधिकाऱ्यांसह केंद्रीय पुरातत्व विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, वन विभाग, महावितरण, पंचायत समिती, पोलीस दल, महसूल विभाग, राज्य परिवहन, पशुवैद्यकीय विभाग, आरटीओ, रायगड रोपवे प्रशासन, आरोग्य विभाग, नगरपरिषद प्रशासन, पाणीपुरवठा विभाग यांसह अन्य शासकीय, प्रशासकीय विभागांचे प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते.

**रायगडावर विविध कार्यक्रमांचे आयोजन**

रायगड किल्ल्यावर दि. १२ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये राजदरबारात श्री शिवप्रतिमा पूजन, सैन्यदल अधिकारी आणि सरदार घराणे सन्मान, गडरोहण स्पर्धा बक्षिस वितरण सोहळा, श्री शिवपुण्यस्मृती रायगड पुरस्कार वितरण, शिवरायमुद्रा स्मरणिका प्रकाशन असे विविध कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शाह हे उपस्थित राहणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील यावेळी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास अनेक मंत्री, खासदार व आमदार उपस्थित राहून अभिवादन करणार आहेत. कार्यक्रमात श्री शिवपुष्पस्मृती रायगड पुरस्कार दुर्ग अभ्यासक निलकंठ रामदास पाटील यांना प्रदान करण्यात येणार आहे. तसेच सैन्यदल अधिकारी ले.जन. संजय कुलकर्णी यांचा सन्मान व सरदार घराणे सन्मान, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज उदयसिंगजी होळकर यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

**दौऱ्यादरम्यान ड्रोनसह हवाई उपकरणांवर बंदी**

दौऱ्यात रायगड जिल्ह्यातील किल्ले रायगड व सुतारवाडी येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे भेट देणार आहेत. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सुरक्षेच्या कारणास्तव सकाळी ७ ते दुपारी ४ यावेळेत दोन कि.मी. परिसरात ड्रोन, पॅराग्लायडर, पॅरामोटर्स, हॅंडग्लायडर्स इत्यादींच्या वापरावर बंदी घातली आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय न्यायसंहिता कलम २२३ अंतर्गत कारवाई करण्यात येणार येईल असे जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले.

खारपाडा ते कशेडीपर्यंत वाहतूक बंदी

या कार्यक्रमाकरिता नागरिक हे आपापली वाहने घेवून हजारोंच्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या काळात अपघात व वाहतूक कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खारपाडा ते कशेडीपर्यंत जड-अवजड वाहनांस वाहतूक बंदी करण्यात आली आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खारपाडा ते कशेडीपर्यंत जड-अवजड वाहनांमुळे जागोजागी वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून दि. १२ एप्रिल रोजी सकाळी ००.०१ ते दुपारी १५.०० वाजेपर्यत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खारपाडा ते कशेडी पर्यत जड-अवजड वाहनांस वाहतूक बंदी करण्याची अधिसूचनेव्दारे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी पारित केले आहेत.

सदरची वाहतूक बंदी अधिसूचना ही दुध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला इत्यादी जीवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड वाहने रुग्णवाहिका, तसेच महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रमासाठी येणारी वाहने यांना लागू राहणार नाही असेही जिल्हाधिकारी यांनी आदेशात स्पष्ट केले आहे.

# राम लखन जानकी जय बोलो हनुमान की...

**सर्व** देवतांमध्ये हनुमान देखील एक शक्तिशाली व बुद्धिमान देवता आहे. हिंदू धर्मामध्ये विविध येणाऱ्या संकटांपासून हनुमान मुक्ती देतो, असे हिंदू लोकांचे मानणे आहे. हनुमानाने केवळ रामायणातच नाही, तर महाभारतात देखील अर्जुनाच्या रथाची रक्षा केलेली आपल्याला महाभारतातील लेखात कळते. त्यानंतर कलियुगातही हनुमान संकटांपासून पृथ्वीचे तसेच मानवी जीवनाचे रक्षण करतो, असे हिंदू लोकांचे मानणे आहे.

हनुमान जयंती चैत्र पौर्णिमेच्या दिवशी सूर्योदयाच्या वेळी साजरी केली जाते. या दिवशी हनुमानाच्या देवळात सूर्योदयाच्या आधीपासून कीर्तनाला प्रारंभ करतात. सूर्योदयाला हनुमानाचा जन्म प्राप्त होतो. त्या वेळी कीर्तन संपते आणि सर्वांना प्रसाद वाटला जातो. महाराष्ट्रात हनुमानाला मारुती म्हणतात. महाराष्ट्रात शनिवार तर उर्वरित भागात शनिवार आणि मंगळवार हे मारुतीचे वार मानले जातात. या दिवशी मारुतीला शेंदूर, तेल, तसेच रुईची फफ्फुले आणि पाणी अर्पण करण्याची प्रथा आहे.

मारुतीला नारळ फफोडण्याची परंपरा पूर्वापार चालत आली आहे. त्याने केवळ एका हातावर द्रोणागिरी पर्वत उचलला तसेच समुद्रावरून उड्डाण करून लंकेत प्रवेश केला असे पुराणांमध्ये उल्लेख आहे. हनुमान श्रीराम यांची भक्ती करत होते. आणि या भक्तीतून हनुमानाला शक्ती मिळत होती. पुढे हनुमान हा श्रीराम यांचा आवडता परमभक्त झाला. हनुमानाचा जन्म अंजनेरी पर्वतावर माता अंजनीच्या पोटी झाला आहे. हनुमानाचे वडील केसरी हे होते. लहानपणापासून त्याला अनेक शक्ती प्राप्त झाल्या होत्या.

एकदा सूर्याकडे आकर्षित होऊन त्याला गिळायला म्हणून हनुमानाने सूर्याकडे कूच केले. इंद्र देवासह सर्व देव भयभीत झाले होते. इंद्रदेवाने सूर्याला आणि पृथ्वीला वाचविण्याकरता आपले वज्र हनुमानाकडे फफेकले. त्यामुळे हनुमंत मूर्च्छित झाले त्यानंतर पवन देवाने सर्व सृष्टीतील वायू थांबवून घेतला. त्यामुळे प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले, त्यानंतर सर्व देवतांनी हनुमानाला मूर्च्छितेतून बाहेर आणले व पवन देव शांत होऊन सुरुवाती सारखे वायू पर्यावरणात सोडले. तसेच तेव्हा हनुमानाला सर्व देवतांनी आशीर्वाद देत काही शक्ती प्रदान केल्या.

एक दिवस खेळते वेळी हनुमानाने एका ऋषीचा परिहास केला. त्यामुळे त्याला शाप मिळाला तुला तुझ्या सर्व शक्तींचा विसर पडेल. पुढे प्रभू श्रीरामचंद्र वनवासात असतांना त्यांची आणि हनुमंताची भेट झाली. हनुमान यांनी प्रभू श्रीरामाची वनवासात आणि युद्धादरम्यान फफार मदत केली. हनुमंताच्या आणि वानर सेनेच्या बळावरच श्रीराम यांनी रावणाशी युद्ध केले आणि शेवटी जिंकले देखील.

हनुमान जयंती चे महत्व:

हनुमान जयंतीचे हिंदू धर्मात खूप महत्त्व आहे. यांच्या मागे संकटे किंवा साडेसाती असणाऱ्यांनी हनुमंताची आराधना करावी असे मानले जाते. असे अनेक कारणे आपल्याला दिसून येतात. हनुमान चालिसा म्हणणाऱ्याना आत्मिक समाधानाची प्राप्ती होते. साडे साती असतांना दररोज किंवा किमान प्रत्येक मंगळवारी व शनिवारी मारूतीचे दर्शन घ्यावे. हनुमंत चिरंजीवी असल्याने तो आज देखील अस्तित्वात असल्याची भाविकांमधे मान्यता आहे. हनुमानाला लावण्यात येणारा शेंदूर अत्यंत पवित्र मानला जात असून भाविक त्या शेंदुराला आपल्या मस्तकावर धारण करतात.

तसेच शरीर सौष्ठव कमविण्याची आवड असणाऱ्यांनी हनुमंताची आराधना करावी असे मानले जाते. हनुमंतामध्ये बलतत्वाचा संचार असल्याने स्त्रियांनी त्याचे दर्शन दुरून घ्यावे अशी देखील एक मान्यता आहे. हिंदु मान्यतेनुसार हनुमंताला शक्ति



स्फ्फुर्ति आणि ऊर्जेचे प्रतिक मानले जाते. सर्व संकटाचे निवारण करण्याची क्षमता हनुमंता मध्ये आहे. समर्थ रामदास स्वामींनी संपूर्ण महाराष्ट्रभर मारूती रायाच्या मुर्तींची स्थापना केली आहे. समर्थ रामदास स्वामी म्हणतात, ङ्गसर्वात वेगवान मनुष्याचे मन आहे आणि मनाला पकडण्याचे सामर्थ्य केवळ हनुमानातच आहे. रोगमुक्तीसाठी वीर हनुमान मंत्राचा प्रयोग करतात. भूतबाधा झाली असता, त्याला हनुमानाच्या मंदिरात नेतात किंवा हनुमान मंत्र, स्तोत्रे म्हणतात.

महाशिवरात्री सणाची माहिती

स्त्रिया पुत्र प्राप्तीसाठी मारुतीची उपासना करतात. निपुत्रिक स्त्री भिंतीवर शेंदूराने मारुतीची आकृती काढून त्याची पूजा करते. त्याच्यापुढे चढते-उतरते, कणकेचे दिवे लावते. शनिवारी हनुमानाच्या गळ्यात रुईच्या पानांची किंवा फफुलांची माळ घालून त्याला उडी दवा मीटर पण करते. हनुमानाची उपासना ही मनोकामना पूर्ण करणारी आणि लौकिक सिद्धी प्राप्त करून देणारी आहे, असा लोकांचा विश्वास आहे.

हनुमान जयंती कशी साजरी करतात :

हिंदू धर्मामध्ये हनुमान जयंती ही मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरी केली जाते. राजा दशरथाने पुत्रप्राप्तीसाठी पुत्रकामेष्टी यज्ञ केला असता यज्ञातून अग्निदेव प्रकट होऊन, त्यांनी दशरथाच्या राण्यासाठी पायस प्रदान केले होते. दशरथाच्या राण्याप्रमाणेच तपश्चर्या करणाया अंजनीलाही पायस म्हणजेच खीर यज्ञातील हा प्रसाद दिला होता. त्यादिवशी चैत्र पौर्णिमा होती. तो दिवस हनुमान जयंती म्हणून साजरा करतात.

काही पंचांगांच्या मते, हनुमानाची जन्मतिथी आश्विन वद्य चतुर्दशी आहे. तर काहींच्या मते चैत्र पौर्णिमा आहे. महाराष्ट्रातील हनुमान जयंती चैत्र पौर्णिमेला साजरी होते. हनुमान जयंतीच्या दिवशी लोक हनुमान मंदिरात दर्शनासाठी जातात. काही लोक उपवास ठेवतात, समर्पण आणि उत्साहाने त्यांची उपासना करतात. हनुमानाबद्दल असे म्हटले जाते की, हनुमान ब्रह्मचारी होते, त्यांना जानवे देखील परिधान केले जाते. हनुमानजीच्या मूर्तींवर सेंदूर आणि चांदीचे काम करण्याची परंपरा आहे.

काही लोकांच्या मते, एकदा रामाच्या दीर्घायुष्यासाठी हनुमानाने आपल्या संपूर्ण शरीरावर सेंदूर लावला होता. म्हणूनच त्याला आणि त्याच्या भक्तांना चोळा असे म्हणतात. संध्याकाळी दक्षिण मुखी हनुमान मूर्तीसमोर मंत्र, जप आणि जाप करण्यास अत्यंत महत्त्व दिले जाते. तुलसीदासच्या रामचरित्रमानसमध्ये हनुमानाची माहिती वाढवली दिसते. हनुमान जयंतीच्या दिवशी सर्व मंदिरात हनुमान चालीसा मजकूराचे वाचन होते.

सर्वत्र भंडाराचे आयोजन केले जाते. तमिळनाडू आणि केरळमध्ये मार्गशीर्ष महिन्याच्या अमावस्या आणि ओरिसामध्ये वैशाख महिन्याच्या पहिल्या दिवशी हनुमान जयंती साजरी केली जाते. कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात हा उत्सव चैत्र पौर्णिमेपासून वैशाख महिन्याच्या दहाव्या दिवसापर्यंत साजरा केला जातो.

हनुमान जयंतीविषयी पौराणिक कथा:

हनुमान जयंती विषयी शिवपुराणात एक कथा आहे. ती म्हणजे एकदा महादेवाने विष्णूचे मोहिनी रूप पाहिले त्यामुळे शिव कामासक्त झाला आणि त्याचे वीर्यपतन झाले. सप्तर्षींनी ते वीर्य पानावर घेऊन कर्णद्वारे गौतामिकांया अंजनीच्या ठिकाणी स्थापन केले. त्या वीर्यामुळे अंजनी गर्भवती झाली व तिने हनुमानाला जन्म दिला.

एकनाथी भागवतात महाराष्ट्रात प्रचलित असलेली कथा दिली आहे. दशरथाने पुत्रकामेष्टी केला. त्या वेळी पायसाचा एक भाग घारीने पळवला आणि पर्वतावर ध्यान करत असलेल्या अंजनीच्या पदरात टाकला. अंजने तो खिरीचा प्रसाद भक्षण केला आणि कालांतराने हनुमानाला जन्म दिला.

लक्ष्मण मूर्च्छित पडला असता, हनुमान द्रोनागिरी पर्वत घेऊन जात असताना, त्याला भरतने बाण मारल्यामुळे त्याच्या पायाला दुखापत झाली. ही दुखापत झाल्यानंतर त्याच्या पायांना शेंदूर आणि तेल लावल्यामुळे बरी झाली म्हणून हनुमंताला शेंदूर आणि तेल वाहतात असे म्हटले जाते.

हनुमानाची वेगवेगळ्या ठिकाणी अनेक मंदिर आहेत. तसेच विदेशातही हनुमानाची मंदिरे प्रस्थापित झालेली आपल्याला दिसून येतात. अशाप्रकारे हनुमानाचा महिमा वाढत रहावा हा त्यामागचा उद्देश आहे.

# भक्ती आणि शक्ती यांचा सुरेख संगम : मारुति

**मनोजवमब मारुततुल्यवेगञब,**
**जितेन्द्रियमब बुद्धिमतां वरिष्ठमब ।।**
**वातात्मजं वानरयूथमुख्यं, श्रीरामदूतं**
**शरणमब प्रपद्ये ।।**

**अर्थात** मनोवेगाने जाणारा, वाऱ्याप्रमाणे वेगवान, जितेंद्रिय, बुद्धिमानांमध्ये श्रेष्ठ, वायुपुत्र, वानरसमुदायाचा अधिपती आणि श्रीरामाचा दूत, अशा मारुतीला मी शरण आलो आहे.

मारुतीच्या अतुलनीय गुणवैशिष्ट्यांची ओळख या एका श्लोकावरून होते.


लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच जवळचा वाटणारा एक देव म्हणजे 'मारुति' ! मारुति हा सर्वशक्तिमान, महापराक्रमी, महाधैर्यवान, सर्वोत्कृष्ट भक्त व संगीतज्ञानमहंता म्हणूनही प्रसिद्ध आहे. जीवनाला परिपूर्ण करणारे जे जे आहे, त्या त्या सर्वांचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे मारुति. शक्ती, भक्ती, कला, चातुर्य आणि बुद्धीमत्ता यांनी श्रेष्ठ असूनही प्रभु रामचंद्रांच्या चरणी सदैव लीन रहाणाया मारुतीच्या जन्माचा इतिहास आणि त्याची काही गुणवैशिष्ट्ये या लेखातून जाणून घेऊया.

जन्माचा इतिहास

राजा दशरथाने पुत्रप्राप्तीसाठी 'पुत्रकामेष्टी यज्ञ' केला. तेव्हा यज्ञातून अग्निदेव प्रगट होऊन त्याने दशरथाच्या राण्यांसाठी पायस (खीर, यज्ञातील अवशिष्ट प्रसाद) प्रदान केला होता. दशरथाच्या राण्यांप्रमाणेच तपश्चर्या करणाया अंजनीलाही पायस मिळाले होते आणि त्यामुळेच मारुतीचा जन्म झाला होता. त्या दिवशी चैत्रपौर्णिमा होती. तो दिवस 'हनुमान जयंती' म्हणून साजरा करतात. वाल्मीकिरामायणात (किष्किंधाकांड, सर्ग ६६) पुढीलप्रमाणे हनुमानाची जन्मकथा दिली आहे - अंजनीच्या पोटी हनुमान जन्मला. जन्म झाल्यावर 'उगवणारे सूर्यबिंब हे एखादे पक्व फळ असावे', या समजुतीने हनुमानाने आकाशात उड्डाण करून त्याकडे झेप घेतली. त्या दिवशी पर्वतिथी असल्यामुळे सूर्याला गिळण्यासाठी राहु आला होता. सूर्याकडे झेपावणारा हनुमान हा दुसरा राहुच आहे, या समजुतीने इंद्राने त्याच्यावर वज्र फेकले. ते हनुवटीला लागून ती छाटली गेली. यावरून त्याला 'हनुमान' हे नाव पडले.

१. कार्य व वैशिष्ट्ये

सर्वशक्तिमान : सर्व देवतांमध्ये फक्त मारुतीला वाईट शक्ती त्रास देऊ शकत नाहीत. लंकेत लाखो



राक्षस होते, तरीही ते मारुतीला काही करू शकले नाहीत. जन्मतःच मारुतीने सूर्याला गिळण्यासाठी उड्डाण केले अशी जी गोष्ट आहे, तीतून वायुपुत्र (वायुतत्त्वातून निर्माण झालेला) मारुति हा सूर्याला (तेजतत्त्वाला) जिंकणारा होता हे लक्षात येते. पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या तत्त्वांत वायुतत्त्व हे तेजतत्त्वापेक्षा जास्त सूक्ष्म, म्हणजे जास्त शक्तिमान आहे.

भक्त : दास्यभक्तीचे एक सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणून अजूनही मारुतीच्या रामभक्तीचेच उदाहरण देतात. आपल्या प्रभूंकरिता प्राणार्पण करण्यासाठी तो सदैव तयार असे. त्यांच्या सेवेपुढे त्याला शिवतत्व व ब्रह्मत्व यांची इच्छाही कवडीमोल वाटत असे. हनुमान म्हणजे सेवक व सैनिक यांचे मिश्रण होय !

बुद्धिमान : व्याकरणसूत्रे, सूत्रवृत्ति, वार्तिक, भाष्य आणि संग्रह यांत मारुतीची बरोबरी करणारा कोणी नव्हता (उत्तररामचरित ३६.४४-४६). मारुतीला अकरावा व्याकरणकार मानतात.

मानसशास्त्रात निपुण व राजकारणपटु : अनेक प्रसंगी सुग्रीवादि वानरच काय, पण रामानेही याचा सल्ला मानला आहे. रावणाला सोडून आलेल्या बिभीषणाला आपल्या पक्षात घेऊ नये, असे इतर सेनानींचे मत असता, मारुतीने 'त्याला घ्यावे' असे सांगितले व रामाने ते मान्य केले. लंकेत सीतेच्या प्रथम भेटीच्या वेळी तिच्या मनात स्वतःबद्दल विश्वास निर्माण करणे, शत्रुपक्षाला नामोहरम करण्यासाठी लंकादहन करणे, रामाच्या आगमनाबद्दल भरताला काय वाटते ते पहाण्यासाठी रामाने त्यालाच पाठविणे, यावरून त्याची बुद्धिमत्ता व मानसशास्त्रातील निपुणता दिसून येते. लंकादहनानेही त्याने रावणाच्या प्रजेचा रावणाच्या सामर्थ्यावरील विश्वास डळमळीत केला.

**जितेंद्रिय :** सीतेच्या शोधासाठी रावणाच्या अंतःपुरात गेलेल्या मारुतीची मनःस्थिति ही त्याच्या उच्च चारित्र्याची निदर्शक आहे. त्या वेळी तो स्वगत म्हणतो, 'निःशंकपणे पडलेल्या या सर्व रावणस्त्रिया मी ह्या अशा पाहिल्या खऱ्या; परंतु त्या पहाण्यामुळे माझ्या मनामध्ये विकार उत्पन्न झाला नाही.' - वाल्मीकिरामायण, सुंदरकांड ११.४२-४३.

अनेक संतांनीही या जितेंद्रिय अशा हनुमंताची पूजा बांधून त्याचा आदर्श समाजापुढे ठेवला. इंद्रियजित असल्यामुळेच मारुति इंद्रजितालासुद्धा हरवू शकला.

**साहित्य, तत्त्वज्ञान व वक्तृत्वकला यांत प्रवीण :** रावणाच्या दरबारातील त्याचे भाषण हा वक्तृत्वकलेचा उत्कृष्ट नमुना आहे.

**संगीतशास्त्राचा प्रवर्तक :** मारुतीला संगीतशास्त्राचा एक प्रमुख प्रवर्तक मानलेले आहे. समर्थ रामदासस्वामींनी त्याला 'संगीतज्ञानमहंता' असे संबोधले आहे.

**चिरंजीव :** दर वेळी प्रभु श्रीराम अवतार घेतात तेव्हा ते तेच असतात, मात्र मारुति दर अवतारी निराळा असतो. मारुति सप्तचिरंजीवांपैकी एक असला, तरी सप्तचिरंजीव चार युगांचा शेवट झाला की मोक्षाला जातात व त्यांची जागा अतिशय उन्नत असे सात जण घेतात.

२. मूर्तिविज्ञान

अ. दासमारुति व वीरमारुति : हनुमानाची दासमारुति व वीरमारुति ही दोन रूपे आहेत. दासमारुति हा रामापुढे हात जोडून उभा असतो. त्याची शेपटी जमिनीवर रुळलेली असते. वीरमारुति युद्धाच्या पवित्र्यात असतो. त्याची शेपटी वर उभारलेली व उजवा हात मस्तकाकडे वळलेला असतो.

आ. पंचमुखी मारुति : पंचमुखी मारुतीच्या मूर्ती बऱ्याच प्रमाणात आढळून येतात. गरुड, वराह, हयग्रीव, सिंह व कपिमुख ही ती पाच मुखे होत. या दशभुज-मूर्तींच्या हातात ध्वज, खड्ग, पाश इत्यादि आयुधे असतात. पंचमुखी देवतांचा एक अर्थ असा आहे की, पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर या चार व उर्ध्वदिशा अशा पाचही दिशांना त्या देवतेचे लक्ष आहे किंवा तिचे त्यांच्यावर स्वामित्व आहे.

इ. दक्षिणमुखी मारुति : दक्षिण शब्द दोन अर्थांनी वापरला जातो. एक म्हणजे दक्षिण दिशा व दुसरा म्हणजे उजवी बाजू.

गणपति व मारुति यांची सुषुम्नानाडी नेहमी चालू असते; पण रूप बदलल्यावर थोडा बदल होऊन त्यांची सूर्य किंवा चंद्र नाडीही थोड्या प्रमाणात चालू होते.

३. शनीची साडेसाती व मारुतीची पूजा : शनीची साडेसाती असतांना तिचा त्रास कमी व्हावा म्हणून मारुतीची पूजा करतात.

**संदर्भ : सनातन संस्थेचा लघुग्रंथ 'मारुति'**

संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था, संपर्क- ९२८४०२७१८०

# आला उन्हाळा, तब्येत सांभाळा

## जिल्ह्यातील ५३ प्राथमिक आरोग्य केंद्रात उष्माघात कक्ष

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्ह्यात उन्हाच्या झळा वाढल्या असून, कमाल तापमान ४० अंशावर जात आहे, तसेच पुढील तीन महिने तापमानाचा पारा वाढणार असून नागरिकांनी काळजी घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान वाढत्या तापमानामुळे होणाऱ्या आजारांवर उपचारासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभाग सतर्क झाला असून मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांनी जिल्ह्यातील सर्व ५३ प्राथमिक आरोग्य केंद्रात उष्माघात कक्ष स्थापन करून तेथे पुरेसा औषधसाठाही ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत.

जिल्ह्यात सर्वसाधारणपणे दरवर्षी एप्रिल ते जून या महिन्यात उष्माघाताचा प्रादुर्भाव होतो. तसेच त्यामुळे मृत्यू होणेही संभव असते. त्यातच आतापासूनच जिल्ह्यातील कमाल तापमान वाढत चालले आहे. जिल्ह्यातील तापमानाचा पारा ४० अंशावर जात आहे.

या पार्श्वभूमीवर उष्माघाताच्या प्रकोपापासून वाचण्यासाठी नागरिकांनी जागरूक राहण्याची गरज आहे. त्यासाठी नागरिकांना जागरुक करण्यासाठी खालील माहिती देण्यात आली आहे.

उष्माघाताची लक्षणे

१. उन्हाळ्यात शरीराचे तापमान वाढल्यास त्याला उष्माघात म्हणतात.

२. मळमळ, उलटी, ताप, त्वचा कोरडी पडणे, भूक न लागणे, थकवा, चक्कर येणे, डोकेदुखी या तक्रारी सुरू होतात.

३. मनाची स्थिती बिघडते, व्यक्ती असंबंध बडबड करते, चिडचिड करते. जीभ जड होते, जास्त घाम येतो, पायात गोळे येतात.

४. पोटऱ्यात वेदना किंवा पेटके येणे, रक्तदाब वाढणे, मानसिक बेचैनी व अस्वस्थता, बेशुद्धावस्था.

**उष्माघाताची कारणे**




उन्हाळ्यात शेतात किंवा इतर मजुरीची कामे फार वेळ करणे, कारखान्याच्या बॉयलर रुममध्ये तसेच काच कारखान्यात काम, अधिक तापमानाच्या खोलीत काम, घट्ट कपड्याचा वापर.

प्रतिबंधात्मक उपाय

दर तासाला १ ते दीड ग्लास पाणी प्यावे. लिंबू सरबत, शहाळे, फळांचा ताजा रस, पन्हे, कोकम सरबत, ताक, लस्सी असे द्रवपदार्थ घ्यावेत. आराम करावा, सैलसर, फिक्कट रंगाचे किंवा पांढऱ्या रंगाचे कपडे परिधान करावेत. उन्हाळ्याची चाहूल लागली की वाढत्या तापमानात फारवेळ कष्टाची कामे टाळणे. कष्टाची कामे सकाळी किंवा सायंकाळी कमी तापमानात करणे, जलसंजीवनीचा वापर, भरपूर पाणी प्यावे, सरबत प्यावे, उन्हामधील काम अधूनमधून थांबवावे, सावलीत विश्रांती घ्यावी, उन्हात बाहेर जाताना काळ्या काचेचा चष्मा, डोक्यास उन लागू नये म्हणून टोपी, टॉवेल, फेटा, उपरणे यांचा वापर करावा. गरज नसेल तर उन्हात बाहेर फिरू नये. जर बाहेर जावे लागलेच तर उन्हापासून संरक्षण होईल याची काळजी घ्यावी.

### – उष्माघातापासून बचाव –
### – काय करावे ? –

अतिउष्णतेच्या परिस्थितीत सर्वसामान्य जनतेने हायड्रेटेड राहणे गरजेचे आहे. त्यासाठी तहान लागली नसली तरीही जेव्हा शक्य असेल तेव्हा पुरेसे पाणी प्यावे. तसेच प्रवास करताना पिण्याचे पाणी सोबत ठेवावे.

भरपूर ताजे व हलके अन्न खाल्ल्यानंतरच घरातून बाहेर पडावे. फळे आणि सलाड सारखे पचायला हलके असणारे अन्न खावे. पातळ, सैल, सुती, आरामदायी शक्यतो फिकट रंगाचे कपडे परिधान करावेत. उन्हात बाहेर जाताना डोके झाकावे. टोपी/कपडा/छत्रीचा वापर करावा. भरपूर पाणी, ओ. आर. एस. पाण्याचे द्रावण, ताक किंवा लस्सी, लिंबूपाणी, कैरीचे पन्हे इत्यादी घरगुती पेय घ्यावे. थोडेसे मीठ घालून फळांचा रस घ्यावा. टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्षे, अननस, काकडी, कोशिंबिर, इतर स्थानिक उपलब्ध फळे आणि भाज्या यासारख्या उच्च पाण्याचे प्रमाण असलेली हंगामी फळे आणि भाज्या खाव्यात. सूर्यप्रकाशात उन्हात बाहेर जाताना शूज किंवा चप्पल घालावी. भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या (IMD) वेबसाइट https://mausam.imd.gov.in/वर हवामानाची अद्ययावत माहिती मिळवावी. शक्य तितके चांगल्या हवेशीर आणि थंड ठिकाणी, घरामध्ये, सावलीत राहावे. थेट सूर्यप्रकाश आणि उष्णतेच्या लाटांना अडथळा निर्माण करावा. शक्यतो तुमच्या घराच्या ऊन येणाऱ्या बाजूच्या खिडक्या आणि पडदे दिवसा बंद ठेवा, रात्री थंड हवा येण्यासाठी खिडक्या उघडाव्यात. घराबाहेर जात असल्यास, तुमची बाहेरील कामे दिवसाच्या थंड वेळेपर्यंत म्हणजे सकाळी आणि संध्याकाळी मर्यादित करा. दिवसाच्या थंड वेळेमध्ये बाहेरच्या कामांचे वेळापत्रक किंवा नियोजन करावे.

उष्णतेचा त्रास आणि उष्णतेशी संबंधित आजाराचा अति धोका असतो, अशा जोखमीच्या लोकांकडे अतिरिक्त लक्ष दिले पाहिजे. यामध्ये लहान मुले आणि बालके, घराबाहेर काम करणारे लोक, शारीरिकदृष्ट्या आजारी, विशेषतः हृदयरोग किंवा उच्च रक्तदाब, गर्भवती महिला, ज्या लोकांना मानसिक आजार आहे अशा व्यक्तिंचा समावेश होतो. थंड हवामानापासून उष्ण हवामानापर्यंतच्या भागात प्रवास करणाऱ्यांनी त्यांच्या शरीराला उष्णतेला अनुकूल होण्यासाठी एक आठवडा वेळ द्यावा. उष्ण वातावरणात एक्सपोजर/शारीरिक क्रिया हळूहळू वाढल्याने (१०-१५ दिवसांपेक्षा जास्त) अनुकूलता प्राप्त होते.

**प्राथमिक उपचार –** उष्माघाताचा त्रास जाणवू लागल्यास प्रथम भरपूर पाणी प्यावे. उन्हातून आल्यानंतर थोडावेळ बसा आणि नंतर ग्लासमध्ये पाणी ओतून प्या, खूप थंड, बर्फ टाकलेले पाणी पिऊ नये, रुग्णास वातानुकूलित किंवा मोकळ्या हवेशीर खोलीत ठेवणे. खोलीत पंखे, कुलर असावेत. रुग्णाचे तापमान खाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न रुग्णास थंड पाण्याने आंघोळ घालावी, रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवणे, आइस पॅक लावणे, आवश्यकतेनुसार सलाइन देणे. डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

## आरोग्य विभागाची सज्जता

उष्माघात रुग्णास सलाईन द्वारे औषधी मात्र देण्यात येऊन प्राथमिक स्तरावरील उपचार करण्यात येतात. उन्हाची तीव्रता वाढू लागल्याने उष्णतेची निगडित आजारांचा धोका वाढण्याची शक्यता आहे. आणि उष्माघाताच्या रुग्णसंखेत वाढ होऊ नये यासाठी उष्माघात प्रतिबंध उपाय योजना अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिकारी यांचे प्रशिक्षण घेण्यात आले असून, जिल्ह्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर उष्माघात कक्ष स्थापन करण्यात आला, प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात एक खाट उष्माघात रुग्णासाठी राखीव ठेवण्यात आली असून, उष्माघात कक्षामध्ये हवा खेळती राहील, खिडक्या व दरवाजे मोकळे असतील, कक्षामध्ये कुलर, पंखा एसी इ. पैकी २४ तास चालू स्थितीत उपलब्ध राहील, पुरेसे पिण्याचे थंड पाणी उपलब्ध राहील, तापमान नियंत्रण आवश्यक यंत्रणा उपलब्ध करून दिली जावी, ORS द्रावण पाकीट उपलब्ध असावे, आईस पॅक उपलब्ध असतील, उष्माघात कक्षा बद्दलची माहिती संस्थेच्या मुख्य प्रवेशद्वारा जवळ निर्देशित करण्यात येईल, उष्माघात कक्षा हा २४ तास कार्यरत ठेवण्यात येईल. नागरिकांनी घराबाहेर पडताना काळजी घ्यावी. उष्माघाताचा त्रास जाणवू लागल्यास वैद्यकीय सल्ल्यासाठी किंवा निदानासाठी वैद्यकीय अधिकाऱ्याचा सल्ला घ्यावा. लहान मुले, ज्येष्ठांनी विशेष काळजी घ्यावी. असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर. डॉ. अभय धानोरकर यांनी केले आहे.

# वंचित बहुजन आघाडीच्या वतीने महात्मा फुले अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

वंचित बहुजन आघाडी औरंगाबाद शहर जिल्ह्याच्या वतीने आज सकाळी ११ वाजता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त औरंगापुरा येथील फुले यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास जिल्हाध्यक्ष योगेश बन यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते तयब जफर, युवा जिल्हाध्यक्ष सतीश गायकवाड, शहराध्यक्ष पंकज बनसोडे, जिल्हा उपाध्यक्ष रुपचंद गाडेकर, जिल्हा महासचिव मंगेश निकम, एस पी मगरे, कोमल हिवाळे, सुलोचना साबळे, प्रविण जाधव, अशोक खिल्लारे, शकिल अहमद यांसह वंचित बहुजन आघाडी, वंचित बहुजन युवा आघाडी, वंचित बहुजन महिला आघाडी, सम्यक विद्यार्थी आंदोलन, विद्वत सभा,व संलग्न संघटनेचे आजी माजी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वक्फ दुरुस्ती कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांवर १६ एप्रिलला सुनावणी

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

वक्फ दुरुस्ती कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर १६ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या खंडपीठासमोर वक्फ कायदा प्रकरण सूचीबद्ध करण्यात आले आहे. इंडिया आघाडीतील काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष यांच्यासह एआयएमआयएम या पक्षांनी आणि इतर सामाजिक संघटनांनी वक्फ दुरुस्ती कायद्याच्या विरोधात १० पेक्षा अधिक याचिका दाखल केल्या आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळानुसार, सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन हे याचिकांवर सुनावणी करणाऱ्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाचा भाग आहेत. एआयएमआयएमचे खासदार असदुद्दिन ओवैसी यांच्या याचिकेव्यतिरिक्त, न्यायालयाने आप नेते अमानतुल्ला खान, असोसिएशन फॉर द प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राइट्स, अर्शद मदनी, समस्थ केरळ जमियातुल उलेमा, अंजुम कादारी, तैय्यब खान सलमानी, मोहम्मद शफी, मोहम्मद फजलुररहीम आणि राजद नेते मनोज कुमार झा यांनी दाखल केलेल्या याचिका सुनावणीसाठी सूचीबद्ध केल्या आहेत.

दरम्यान, मंगळवारी (८ एप्रिल ) केंद्र सरकारने याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केले आहे. वक्फ दुरुस्ती कायद्यावरील याचिकांवर काही आदेश देण्यापूर्वी न्यायालयाने सुनावणी घ्यावी, अशी विनंती केंद्राने न्यायालयाकडे कॅव्हेटमध्ये केली आहे. याच दिवशी देशभरात वक्फ दुरुस्ती कायदा लागू झाल्याची अधिसूचना केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्रालयाने जारी केली आहे. या अगोदर ५ एप्रिल रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी वक्फ दुरुस्ती विधेयकाला मंजुरी दिली. त्यापूर्वी संसदेच्या दोन्ही सभागृहांनी हे विधेयक मंजूर केले.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव विद्यापीठाच्या सेवेत 'रुग्णवाहिका'दाखल

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सेवेत अत्याधुनिक ॲम्ब्यूलन्स (रुग्णवाहिका) दाखल झाली आहे. यावेळी स्टेट बॅंक ऑफ इंडिया महाराष्ट्राचे उपमहाव्यवस्थापक चंद्रशेखर रच्या यांची प्रमुख उपस्थिती होती. कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य केंद्रात हा सोहळा झाला.

विद्यापीठातील विद्यार्थी, कर्मचारी व शिक्षकांसाठी 'रुग्णवाहिका' व यंत्रसामुग्री उपलब्ध व्हावी यासाठी मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी स्टेट बॅंक ऑफ इंडियाकडे प्रस्ताव मांडला होता. बॅंकेने सकारात्मक प्रतिसाद देऊन रुग्णवाहिकेसह १८ लाखांची यंत्रसामुग्री उपलब्ध करुन दिली. यामध्ये मारुती इको ॲम्ब्यूलन्स व्हॅन, कॉन्फिडन्ट डेन्टल चेअर, ऑटोमेटॉलॉजी ॲनालाझर व १२ लीड इसीजी मशीनचा समावेश आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवानिमित्त या सामुग्रीचे शुक्रवारी आरोग्य केंद्रात लोकार्पण करण्यात आले. यावेळी उपमहाव्यवस्थापक चंद्रशेखर रच्या, प्रादेशिक व्यवस्थापक राहुल शर्मा, रविंद्र सरडे, निलेश साखरे, शाखा व्यवस्थापक विनय राऊत, प्रियंका यादव यांची उपस्थिती होती. मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली होते. यावेळी प्रकुलगुरु डॉ.वाल्मिक सरवदे, कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर, लेखा विभागाचे उपकुलसचिव डॉ.संजय कवडे, आरोग्य अधिकारी डॉ.आनंद सोमवंशी यांची उपस्थिती होती. आगामी काळात देखील विद्यापीठास 'सीएसआर' निधी उपलब्ध करुन देऊ, असे चंद्रशेखर रच्या म्हणाले. तर चालू अर्थसंकल्पात आरोगब केंद्रासाठी ५० लाखांची तरतूद केल्याचे मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी म्हणाले. डॉ.संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन तर डॉ.आनंद सोमवंशी यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी डॉ.नेहा मेनकुदळे, डॉ.रोहित वैष्णव, स्मिता पाईकराव, निर्मला खरात, शगीर शेख, जगन गायकवाड आदींनी प्रयत्न केले.

# महात्मा फुले जयंती शिवराणा सेवा संघ वतीने पुंडलिकनगर येथे साजरी



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

येथील पुंडलिकनगर येथे शिवराणा सेवा संघ व नागरी विकास सेवाभावीसंस्था तसेच शिवराणा वाचनालय वतीने महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे मा.भाऊसिंग बैनाडे, प्रा .संतोष गडदे मा.भिमसिंग कहाटे, यांनी विचार मांडले.

वाचन संस्कृती संस्कार जपत प्रगती सुसंस्कृत समाज घडविण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा आहे भिमसिंग काहटे यांनी विचार मांडले तसेच या वेळी पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला.

या वेळी सुत्रसंचलन एल डी ताटू यांनी केले तर या वेळी उपस्थित दुर्गासिंग महेर,राज आनंद परदेशी, प्रकाश देशमुख, गणेश राजपूत बाळासाहेब केंद्रे, संदीप राजपूत, देविदास जाधव , रमेश खरात, घुनावत यांनी आभार मानले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव महासमितीच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुलेंना अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

क्रांती सूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव महासमितीच्या वतीने औरंगापुऱ्यातील क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.

महात्मा फुले यांना आपले गुरु डॉ बाबासाहेब आंबेडकर मानायचे. अशा दोन गुरु शिष्य असलेल्या महामानवाची जयंती आपण साजरी करताना नव्या तरुण पिढीने त्यांचे विचार आत्मसात करून ते प्रत्यक्ष कृतीत आणले पाहिजे असे महासमितीचे अध्यक्ष विजय मगरे यांनी स्पष्ट करून माणसाला माणूस म्हणून जगवणाऱ्या या दोन्ही महामानवाला अभिवादन करून महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३४ वी जयंती उत्सव महासमितीचे नवनर्वाचित अध्यक्ष विजय मगरे, मुख्य सल्लागार मिलिंद दाभाडे, मुख्य समन्वयक गौतम खरात, गौतम लांडगे, स्वागतध्यक्ष चंद्रकांत हिवराळे, वरिष्ठ उपाध्यक्ष संतोष भिंगारे, माजी अध्यक्ष रामभाऊ पेरकर, अशोक निकम, जयश्री शिर्के, रूपाली सुतार, योगिता वैष्णव, अक्षता दाभाडे, प्रसिद्धी प्रमुख सचिन लिला सुखदेव अंभोरे यांची उपस्थिती होती.

# चोलामंडलम विमा कंपनी मार्फत रुग्णवाहिकांचे लोकार्पण

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या शेती पिक विमा बाबत काम करणारी चोलामंडलम विमा कंपनीच्या मार्फत सामाजिक दायित्व निधी मधून जिल्ह्यातील आरोग्य सुविधेसाठी दोन अति सज्ज रुग्णवाहिकेचे लोकार्पण जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अंकित,अपर जिल्हाधिकारी प्रवीण फुलारी , जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, प्रकाश देशमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर , जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी तसेच चोलामंडलम इन्शुरन्स प्रा.लि.




कपनी छत्रपती संभाजीनगर यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील भराडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी एक रुग्णवाहिका तसेच जिल्हाभरातील तपासणीतील उपचारासाठी एक रुग्णवाहिकेचा वापर करण्यात येणार आहे या रुग्णवाहिकेच्या सुविधेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी १०२ या टोल फ्री क्रमांकावर फोन करण्याचे आवाहन जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे. सामाजिक दायित्व म्हणून चोलामंडलम विमा कंपनीच्या मार्फत या रुग्णवाहिकेचे लोकार्पण जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

# जल जीवन मिशनच्या कामाची केंद्रीय पथकाच्याद्वारे पाहणी

## जिल्ह्यातील विविध ठिकाणी पाहणी करून केले समाधान व्यक्त

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

केंद्र शासनाच्या जल जीवन मिशन प्रकल्प अंतर्गत जिल्ह्यात सुरू असलेल्या विविध कामाची पाहणी केंद्र शासन नियुक्त सदस्य समीर कुमार पांडा व रवींद्र सोळंके यांनी गंगापूर वैजापूर सिल्लोड फुलंब्री या तालुक्यातील विविध कामाची पाहणी केली.या पाहणी दरम्यान कामविषयीचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आला. पाहणी दरम्यान केलेल्या कामकाजाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले .

अपर जिल्हाधिकारी प्रवीण फुलारी यांच्याकडे सादर केला. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अंकित यांच्याशी देखील जलजीवन मिशनच्या कामाविषयी चर्चा करण्यात आली.

पथकातील समीर कुमार पांडा व रवींद्र सोळंकी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता दीपक कोळी, जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देसले. जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अजित वाघमारे उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यातील गणोरी ,सिल्लोड तालुक्यातील शिरसाळा व गंगापूर ,वैजापूर तालुक्यातील काही ठिकाणी या पथकाने संयुक्त भेटी देऊन जनजीवन मिशन अंतर्गत केलेल्या कामकाजाच्या पाहणी केली. जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या प्रकल्पाची अंमलबजावणी, होत असलेल्या विविध कामाच्या टप्प्याबाबतही पाहणी करून संबंधित यंत्रणेसोबत चर्चा केली. जल जीवन मिशनच्या कामाच्या पडताळण्यासाठी हे पथक जिल्हा दौऱ्यावर आलेले होते. या पाहणी दरम्यान जलजीवन मिशनच्या कामाविषयी समाधान व्यक्त केले आहे.

# पीकविम्यासाठी ई-पीक पाहणी ॲपवर २५ एप्रिलपर्यंत करणे अनिवार्य

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पुनर्रचित हवामान आधारित फळिपक विमा योजना (२०२४-२५) - आंबिया बहार अंतर्गत नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांनी ई-पिक पाहणी अनिवार्यपणे २५ एप्रिल २०२५ पर्यंत पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे. योजना अंमलबजावणीसाठी युनिवर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी ही विमा कंपनी म्हणून नियुक्त करण्यात आली असून, संबंधित शेतकऱ्यांनी Digital Cro Survey (DCS>) मोबाईलॲप द्वारे ई - पिक पाहणी करणे आवश्यक आहे. ही पाहणी न झाल्यास, शेतकऱ्यांना विम्याचा लाभ नाकारला जाऊ शकतो, अशी माहिती कृषी विभागाने दिली आहे. शासनाने जाहीर केलेल्या नियमानुसार, योजना लाभ घेण्यासाठी ई-पिक पाहणी ही मूलभूत अट असून, त्यात विलंब झाल्यास किंवा पाहणी न झाल्यास विमा दावा मंजूर होणार नाही. त्यामुळे सर्व लाभार्थी शेतकऱ्यांनी वेळेत ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अमोघ ब्रह्मपूरकरला सायन्स ऑलिम्पियाडमध्ये सुवर्ण पदक

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

नॅशनल सायन्स ऑलिम्पियाड नवी दिल्लीतर्फे घेण्यात आलेल्या सायन्स ऑलिम्पियाडच्या परीक्षेमध्ये अमोघ धनंजय ब्रह्मपूरकरने सुवर्ण पदक मिळवले आहे. अमोघ ज्ञानदा इंग्लिश स्कूल मधील इयत्ता तिसरी मधील विद्यार्थी आहे. शाळेतून अमोघने प्रथम येण्याचा म ान देखील मिळवला आहे. मागच्या वर्षी इयत्ता २ री मध्ये देखील २ सुवर्ण पदक मिळवले आहेत. अमोघच्या यशाबद्दल ज्ञानदा इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या वृषाली धाट, सारिका रणसिंग, स्वाती भास्कर, प्रीती गुंजकरसह शाळेच्या सर्व शिक्षकांनी, आई डॉ. मंजिरी आणि वडील पत्रकार धनंजय ब्रह्मपूरकर यांनी अभिनंदन केले आहे.



# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम २०२४-२५; १०१५ कर्ज प्रस्तावांना मंजूरी देऊन उद्दिष्टपूर्ती

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजने अंतर्गत जिल्ह्यासाठी ९८६ इतके उद्दिष्ट देण्यात आले होते तथापि विविध बँकेमार्फत जिल्हाभरात एकूण १ हजार १५ कर्ज प्रस्ताव मंजूर झाले आहेत. या आर्थिक वर्षात जिल्ह्याने १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण केले आहे, अशी माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक स्वप्निल राठोड यांनी दिली आहे. यासंदर्भात आज जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने उत्कृष्ट समन्वयासाठी वमुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याने जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे आभार मानण्यात आले. योजनेचे नोडल अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक स्वप्निल राठोड, एस.आर.वाघले उपस्थित होते. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेद्वारे उत्पादन क्षेत्रातील उद्योजकाला ५० लाख रुपये, तर सेवा क्षेत्रातील उद्योजकाला २० लाखापर्यंत कर्ज दिले जाते. सर्वसाधारण प्रवर्गातील उद्योजकाला कर्ज रक्कमेच्या १५ ते २५ टक्के, तर विशेष प्रवर्ग, एससी, एसटी, महिला, अपंग, माजी सैनिक, ओबीसी व अल्पसंख्याकांना २५ ते ३५ टक्के अनुदान दिले जाते. जिल्हा उद्योग केंद्राकडे अर्ज सादर केल्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षेतेखाली जिल्हास्तरीय कार्यबल समिती मार्फत कर्ज प्रस्ताव बँकेकडे शिफारस केले जातात. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातून उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांची समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आली. प्रत्येक बँकनिहाय प्रलंबित प्रस्तावांचा पाठपुरावा नियमितपणे करण्याचे जिल्हाधिकारी स्वामी यांचे निर्देश होते. जिल्ह्यासाठी ९८६ इतके उद्दिष्ट देण्यात आले होते तथापि विविध बँकेमार्फत जिल्हाभरात एकूण १ हजार १५ कर्ज प्रस्ताव मंजूर झाले

## क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त अभिवादन



**क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त सुभद्राबाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. आज दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त सुभद्राबाई शिक्षण प्रसारक मंडळ वतीने अभिवादन करण्यात आले. सर्वप्रथम महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सुभद्राबाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रामदास गायकवाड,रावसाहेब लहाने, गिरी,उदय काळे,विजयसिंग झाला आदी उपस्थित होते.**

# उष्णतेशी लढाःगुरुवारी कार्यशाळा

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

वाढत्या तापमानामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्य, नागरी सम स्यांसंदर्भात सर्व संबंधित विभागातील अधिकारी- कर्मचाऱ्यांची गुरुवार दि.१७ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात सकाळी १० ते दुपारी साडे १२ या वेळात ही कार्यशाळा होणार आहे. उपस्थितीचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनोद खिरोळकर यांनी केले आहे.

# आम्ही तर आमच्या देव्हाऱ्यात फुले, शाहू, आंबेडकरांना स्थान दिले बहुजनानो तुम्ही फुले यांना आपल्या दरवाजाच्या आत तर प्रवेश घ्या- निकोसे!



**नागपूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

बहुजनांचे उद्धारक महात्मा फुले यांना किती विषम परिस्थितीतून सामाजिक, शैक्षणिक परिवर्तनाच्या दिशेने संघर्ष करावा लागलेला असेल परंतु त्यांच्या आदर्शाचा पाढा वाचला किती बहुजन समाज पुढे आला आजपण नव्वद टक्के समाज आंबेडकरांना तर सोडाच महात्मा फुले यांना जवळ करताना दिसत नाही आम्ही तरी फुले, शाहू, आंबेडकरांना आमच्या देव्हाऱ्यात पुजनीय स्थान दिले तुम्ही तरी महात्मा फुले यांना आपल्या दरवाजाच्या आत प्रवेश घ्या असे प्रतिपादन आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष नामदेवराव निकोसे यांनी केले ते आज महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त महात्मा फुले आणि बहुजन ओबीसी यांचे नाते काय या विषयावर आयोजित परिसंवादात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमात वक्ते म्हणून सुखदेव राव उपाख्य मामासाहेब मेश्राम सन्माननीय ढोके साहेब हे होते या प्रसंगी परिवर्तनशील ब्राह्मण मोर्चा चे नेते अतुल गंगापूरकर, रोहीत पांडे, अभिषेक मिश्रा, चरणदास गायकवाड, राजीव कांबळे,शालिक बांगर, मुन्ना ढोणे पुणशिल बोदिले, मनोहर इंगोले, प्रा.रमेश दुपारे राशिद अली, सलिम खान, रामभाऊ वाहणे, उपस्थित होते.

# जलसंपदा विभाग अधिक लोकाभिमुख करून महामंडळाच्या सक्षमीकरणासाठी मिशन मोडवर काम करावे - जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जलसंपदा विभाग हा महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाशी सर्व यंत्रणा, नागरिक, शेतकरी व अन्य घटक जोडले गेले आहेत. त्यामुळे जलव्यवस्थापन कृती पंधरवड्यात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाच्या माध्यमातून जलसंपदा विभाग अधिक लोकाभिमुख करून महामंडळाच्या सक्षमीकरणासाठी मिशन मोडवर काम करावे, अशा सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी आज दिल्या.

जलसंपदा विभागामार्फत १५ ते ३० एप्रिल २०२५ कालावधीत 'जल व्यवस्थापन कृती पंधरवडा' साजरा केला जाणार आहे. या पंधरवड्याच्या आयोजनासंदर्भात जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक संपन्न झाली. यावेळी जलसंपदा (विदर्भ, तापी, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन (दूरदृश्य प्रणालीद्वारे), जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे, मुख्य अभियंता संजीव टाटू उपस्थित होते. बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी व जलसंपदा विभागाचे अधिकारी सहभागी झाले होते. मंत्री श्री. विखे-पाटील म्हणाले, या पंधरवड्याच्या माध्यमातून जलसाक्षरतेसाठी विविध उपक्रम राबवून जल व्यवस्थापनावर अधिक भर दिला जावा. लोकाभिमुख कार्यक्रमाच्या माध्यमातून विभागाची वेगळी ओळख निर्माण झाली पाहिजे या पद्धतीने



जनजागृतीचे उपक्रम राबविण्यात यावेत. सिंचन व्यवस्था अधिक प्रभावीपणे होण्यासाठी कालवे प्रवाही राहणे अत्यंत महत्त्वाचे आहेत. कालवे दुरुस्ती, कालव्यातून होणारी गळती रोखण्यासाठी जलव्यवस्थापन कृती पंधरवडा मध्ये कालव्यांची स्वच्छता करण्यास प्राधान्य देण्यात यावे.

या कामात स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी. कालवे स्वच्छ आणि प्रवाही राहिल्यास पाण्याचा कार्यक्षम वापर होऊन शेवटच्या घटकाला पाणी उपलब्ध होईल आणि त्यामुळे जनसामान्यात शासनाची प्रतिमा उंचावेल.

या कामात स्थानिक प्रशासन आणि नागरिक यांचाही सहभाग घेऊन जलव्यवस्थापनाच्या प्रक्रियेला गती देण्यात यावी. तसेच कालव्यांवरील अतिक्रमणे काढण्यासही प्राधान्य देण्यात यावे. जलसंपदा विभागाच्या ताब्यात असणाऱ्या मालमत्तांची मोजणी करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा. या जागांची ७/१२ वर नोंदणी करून घ्यावी. यासाठी ॲक्शन प्लॅन करण्यात यावा. जलसंपदा विभागाच्या अखत्यारित असणाऱ्या जागेवरील अतिक्रम काढण्यासाठी मोहीम स्वरूपात काम करावे.

लोकसंख्येच्या प्रमाणानुसार पाणी वापर ठरला असून त्यानुसार पाणी वापराचे ऑडिट करून घ्यावे. पाण्याची गळती रोखण्यासाठी नगरपालिका, महानगरपालिका आणि आणि क्षेत्रीस्तरावर उपाययोजना राबविण्यात याव्यात.

'जलव्यवस्थापन कृती पंधरवडा' मध्ये जलसंपदा विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, शेतकरी, पाणी वापर संस्था संवाद, थकीत पाणीपट्टी वसुली, जल व्यवस्थापनासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग, अनधिकृतपणे पाणी वापर रोखणे, सांडपाण्याचा पुनर्वापर या विषयांनाही प्राधान्य देण्यात यावे, अशा सूचनाही

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816